नवशक्ति
मुंबई, मंगळवार, ४ सप्टेंबर २०१८


# इंडोस्टार कॅपिटल फायनान्स लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस:** वन इंडियाबुल्स सेन्टर, २० वा मजला, टॉवर २ ए, ज्युपिटर मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, मुंबई-४०००१३. **सीआयएन नं.:** एल६५१००एमएच२००९पीएलसी२६८१६०
**फोन:** +९१ २२ ४३१५ ७००० **फॅक्स :** +९१ २२ ४३१५ ७०१०
**वेबसाइट:** www.indostarcapital.com **ई-मेल:** investor.relations@indostarcapital.com

## ९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान आणि सभासद नोंदवही व भागहस्तांतरण पुस्तिका बंद करणे

याद्वारे सूचना देण्यात येते की, **इंडोस्टार कॅपिटल लिमिटेडच्या ("कंपनी")** सभासदांनी **९वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दिनांक २७ सप्टेंबर २०१८** रोजी **सकाळी ११.०० वाजता** (भा.प्र.वे.) **रवींद्र नाट्य मंदिर, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सिद्धिविनायक मंदिराजवळ, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५** येथे, वार्षिक सर्वसाधारण सभेसाठीच्या दिनांक १० ऑगस्ट २०१८ रोजीच्या सूचनेत (**"एजीएमची सूचना"**) उल्लेख केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८साठीचा कंपनीचा वार्षिक अहवाल (**"वार्षिक अहवाल"**) आणि एजीएमची सूचना व त्यासोबत उपस्थिती चिठ्ठी आणि प्रतिनिधी प्रपत्र, ज्या सभासदाने इमेल पत्ता/पत्ते कंपनीकडे/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे/निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता, म्हणजेच लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (**"लिंक इनटाईम"**) यांच्याकडे पत्रव्यवहारासाठी नोंदवलेले आहेत, त्यांना, ज्या सभासदांनी प्रत्यक्ष प्रत मिळण्यासाठी विनंती केली असेल त्यांना वगळून, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्यात आलेले आहेत. ज्या सभासदांनी त्यांचे इमेल पत्ता/पत्ते नोंदवलेले नाहीत किंवा प्रत्यक्ष प्रत प्राप्त करण्याचा पर्याय निवडलेला नाही, त्यांना परवानगी दिल्या गेलेल्या मार्गाने वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना व त्यासोबत उपस्थिती चिठ्ठी आणि प्रतिनिधी प्रपत्र यांच्या प्रती पाठविण्यात आलेल्या आहेत.

हा वार्षिक अहवाल कंपनीच्या http://www.indostarcapital.com/investors.html#annual-reports ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शिवाय, एजीएमची सूचना व त्यासोबत उपस्थिती चिठ्ठी आणि प्रतिनिधी प्रपत्र कंपनीच्या http://www.indostarcapital.com/investors.html#agm-wrap ह्या संकेतस्थळावर, तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या ("सीडीएसएल") www.evotingindia.com ह्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

सभासदांना याद्वारे माहिती देण्यांत येते की, कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०८च्या अनुपालनाच्या अनुषंगाने व त्यासोबत कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४मधील वेळोवेळी यथासुधारित नियम २०च्या सहवाचनांतर्गत, सेक्युरिटिज् अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५मधील (**"लिस्टिंग रेग्युलेशन्स"**) विनियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडियाने जारी केलेले वार्षिक सर्वसाधारण सभेसाठीच्या सेक्रेटरिअल स्टँडर्ड अनुसार एजीएमच्या सूचनेत उल्लेख केलेले ठराव इलेक्ट्रॉनिक माध्यमातून चालविले जातील.

कंपनीच्या सभासदांना एजीएमच्या सूचनेत उल्लेख केलेल्या ठरावांवरील त्यांचा मतदनाचा हक्क बजावण्याची सुविधा एजीएमच्या ठिकाणापासून दूरवरील ठिकाणांहून (**रिमोट ई-व्होटिंग**) उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रिमोट ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कंपनीने सीडीएसएलच्या सेवांचा उपयोग केलेला आहे. रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची प्रक्रिया आणि पद्धत एजीएम सूचनेतील टिपांमध्ये **"इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्यासाठी सूचना"** ह्या सदराखाली दिलेल्या आहेत.

मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा एजीएमला उपस्थित असलेल्या ज्या सभासदांनी त्यांचे मत रिमोट ई-व्होटिंगने दिलेले नसेल त्यांच्यासाठी सभेच्या ठिकाणी उपलब्ध असेल. परंतु ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी त्यांचे मत रिमोट ई-व्होटिंगने दिलेले असेल, ते एजीएमला उपस्थित राहू शकतात पण त्यांना त्यांचे मत मतपत्रिकेद्वारे पुन्हा देण्याचा हक्क नसेल.

रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी **सोमवार, दिनांक २४ सप्टेंबर २०१८** रोजी **सकाळी ९.०० वाजता** (भा.प्र.वे.) सुरू होऊन **बुधवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१८** रोजी **संध्याकाळी ५.०० वाजता** (भा.प्र.वे.) संपेल, ज्यानंतर ही सुविधा सीडीएसएलद्वारे बंद केली जाईल आणि सदर दिवस आणि वेळेनंतर रिमोट ई-व्होटिंगला परवानगी दिली जाणार नाही. अंतिम तारखेस, म्हणजेच **गुरुवार, दिनांक २० सप्टेंबर २०१८** रोजी ज्या सभासदांनी प्रत्यक्ष रूपात किंवा इलेक्ट्रॉनिक/डिमटेरिअलाईझ्ड रूपात भाग धारण केलेले असतील, तेच फक्त एजीएमच्या सूचनेत उल्लेख केलेल्या ठरावांवर रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून किंवा एजीएममध्ये मतपत्रिकेद्वारे मत देण्यात पात्र असतील. सभासदांचे मतदानाचे हक्क अंतिम तारखेस म्हणजेच **गुरुवार, दिनांक २० सप्टेंबर २०१८** रोजी कंपनीच्या एकूण समभाग भांडवलाच्या तुलनेत त्या सभासदाने धारण केलेल्या समभागावरील भरणा केलेल्या रकमेच्या प्रमाणात असतील.

ज्या सभासदांनी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर भाग प्राप्त केले असतील आणि **अंतिम तारखेस** म्हणजेच **गुरुवार, दिनांक २० सप्टेंबर २०१८** रोजी भाग धारण केले असतील, ते त्यांचे मत रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून देण्यासाठी "इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्यासाठी सूचना" पाहू शकतात किंवा investor.relations@indostarcapital.com वर संपर्क साधू शकतात.

रिमोट ई-व्होटिंगसंबंधीची कोणतीही समस्या/शंका/तक्रार यांच्या बाबतीत सभासद, www.evotingindia.com वर **"हेल्प"** सेक्शनखाली असलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (**"एफएक्यूज्"**) आणि ई-होटिंग युजर मॅन्युअल पाहू शकतात किंवा सीडीएसएलच्या किंवा कंपनीच्या खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात.

- **सीडीएसएल:**
  श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेए मॅरेथॉन फ्युचरेक्स, ए-विंग, २५वा मजला, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३ किंवा investor.relations@indostarcapital.com येथे ईमेल पाठवू शकतात किंवा १८००२२५५३३ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करू शकतात.
- **कंपनी:**
  श्री. जितेंद्र भाटी, कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी, वन इंडियाबुल्स सेंटर, २०वा मजला, टॉवर २ए, ज्युपिटर मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, मुंबई - ४०० ०१३ किंवा investor.relations@indostarcapital.com येथे ईमेल पाठवू शकतात किंवा ०२२ ४३१५७००० या क्रमांकावर कॉल करू शकतात.

या कायद्याच्या कलम ९१मधील तरतुदींच्या आणि लिस्टिंग रेग्युलेशन्समधील विनियम ४२ च्या अनुषंगाने कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भागहस्तांतरण पुस्तिका एजीएमसाठी **शुक्रवार, दिनांक २१ सप्टेंबर २०१८** पासून **गुरुवार, दिनांक २७ सप्टेंबर २०१८** पर्यंत राहतील.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
**इंडोस्टार कॅपिटल फायनान्स लिमिटेडकरिता**
**जितेंद्र भाटी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**सभासद क्र.: एफसीएस ८९३७**

**स्थान :** मुंबई
**दिनांक :** सप्टेंबर ३, २०१८